**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

**जावक क्र.** विशेष कक्ष/अ-३९/२०१९-२०/ २e. **दि. २४/०४/२०१९**

# परिपत्रक

**विषय :** विद्यापीठ शैक्षणिक विभाग, संचलित व संलग्न महाविद्यालयांतील अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना द्यावयाच्या प्रवेशासंबंधात अनुसरावयाची कार्यपद्धती...

महोदया / महोदय,

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरुन, विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभाग, संचलित व संलग्न महाविद्यालये यांमध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया राबविण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे ;

**१) जाहिरात / प्रसिध्दी :**

सर्वप्रथम महाविद्यालयात किंवा विभागात शिकविल्या जाणा-या, विविध अनुदानित व विना-अनुदानित अभ्यासक्रमांची प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे योग्य जाहिरात प्रसिध्द करावी.

**२) प्रवेश समिती गठित करणे :**

महाराष्ट्र राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार, प्रवेशांमध्ये आरक्षण धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालय / शैक्षणिक विभाग स्तरावर 'प्रवेश समिती' गठित करावी. ज्या अभ्यासक्रमासाठी केंद्रीयभूत प्रवेश संरचना आहे, त्या महाविद्यालयात सदर समिती 'स्थानिक प्रवेश समिती' म्हणून कार्यरत असेल. समितीवर शिक्षक किंवा वर्ग 'अ' अधिकारी पैकी एक मागासवर्ग प्रतिनिधी नियुक्त करण्यात यावा. समितीने प्रवेशासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांच्या खालीलप्रमाणे अभ्यासक्रमनिहाय निवड याद्या व प्रतिक्षा याद्या तयार कराव्यात आणि प्रवेश नियंत्रित करावेत ;

(अ) <u>गुणवत्ता यादी तयार करणे :</u> सर्वप्रथम प्रवेशासाठी अर्ज केलेल्या सर्व पात्रताधारक विद्यार्थ्यांची (मागायवर्गीय विद्यार्थ्यांसह) गुणवत्तेनुसार/गुणांकानुसार यादी तयार करावी. सदर यादी अभ्यासक्रमनिहाय असावी. प्रत्येक अभ्यासक्रमनिहाय एकूण प्रवेश क्षमतेच्या २४ टक्के विद्यार्थी संख्या ही खुल्या प्रवर्गातून प्रवेशासाठी पात्र ठरत असल्याने, गुणवत्ता यादीतील सुरुवातीच्या २४ टक्के विद्यार्थ्यांची खुल्या प्रवर्गासाठी निवड करावी. सदर यादीत निवड झालेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातूनच प्रवेश देण्यात यावा, त्यांचा समावेश मागासवर्गीय प्रवर्गासाठी तयार केलेल्या यादीत करू नये.

(ब) <u>मागासवर्गीयांच्या राखीव जागा भरण्याची कार्यपध्दती</u> : उपरोक्त क्र. २ (अ) प्रमाणे खुल्या प्रवर्गातील यादीत समाविष्ट असलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्यानंतर खालोखाल गुणवत्ता / गुणांक प्राप्त केलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांची खालील टक्केवारीनुसार प्रवर्गनिहाय निवड यादी तयार करावी व त्याप्रमाणे प्रवेश द्यावा.

| | |
|---|---|
| अनुसूचित जाती | १३ % |
| अनुसूचित जमाती | ०७ % |
| विमुक्त जाती (अ) | ०३ % |
| भटक्या जमाती (ब) | २.५ % |
| भटक्या जमाती (क) | ३.५ % |
| भटक्या जमाती (ड) | ०२ % |
| इतर मागासवर्ग | १९ % |
| सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग | १६ % |
| आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | १० % |
| **एकुण** | **७६ %** |

(क) उपरोक्त (ब) नुसार प्रवेश प्रक्रिया राबविल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास, अशा जागांपैकी एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त ०२ टक्केपर्यंत विशेष मागास प्रवर्गातील (S.B.C) विद्यार्थ्यांना गुणत्तेनुसार प्रवेश देण्याची कार्यवाही करावी.

(ड) उपरोक्त (क) नुसार ०२ टक्केपर्यंत विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देवूनही जर मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर, अशा रिक्त जागा खालीलप्रमाणे मागासवर्गीय प्रवर्गांच्या गटांमधील अन्य प्रवर्गातून गुणवत्तेनुसार अदलाबदलीने (Inter-Changeability) भराव्यात.

गट १ : अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या दोन प्रवर्गात अदलाबदल करावी.

गट २ : विमुक्त जाती (अ) आणि भटक्या जमाती (ब) या दोन प्रवर्गात अदलाबदल करावी.

गट ३ : भ.जमाती (क), भ.जमाती (ड) आणि इतर मागासवर्ग या तीन प्रवर्गांत अदलाबदल करावी.

(ई) उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करून देखील मागासवर्गीय प्रवर्गांच्या जागा रिक्त राहील्या तर विद्यापीठातील शैक्षणिक विभाग आणि विद्यापीठ संचलित महाविद्यालय असल्यास मा. कुलगुरू यांच्या परवानगीने आणि विद्यापीठ संलग्न महाविद्यालयासंदर्भात संस्थेच्या अध्यक्षांच्या परवानगीने अशा रिक्त जागी खुल्या वर्गातून प्रवेश देण्याची कार्यवाही करावी.

**३) सर्वसाधारण सुचना :**

➢ नियमानुसार आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करणेकामी काही अडचणी असल्यास, विद्यापीठाच्या विशेष कक्षाला संपर्क करावा.

- शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकं / निर्णयांनुसार अपंग, सैन्य दलात सक्रिय सेवेत असलेले (ॲक्टीव्ह सर्व्हिसेस) / कर्मचारी तसेच माजी सैनिक यांची पाल्ये व खेळाडू हया वर्गवारीत विद्यार्थ्यांना त्यांच्या विहित टक्केवारीनुसार त्यांच्या संबंधीत खुल्या किंवा मागासवर्गीय प्रवर्गातील राखीव जागांमधून आडवे (Hotizontal) आरक्षण देण्यात यावे.
- खुल्या प्रवर्गातून निवड झालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे देखील, शिष्यवृत्ती आणि फ्रि-शिपचे अर्ज विहित मुदतीत भरून घ्यावेत.
- शासनाकडून प्रतिपुर्ती केली जाणारी कोणतीही फी प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून वसूल करू नये.
- महाराष्ट्र राज्याबाहेरील इतर अन्य राज्यातून स्थलांतरित होऊन आलेल्या, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशाच्यावेळी मागासवर्गीयांच्या राखीव जागेवर प्रवेश देण्यात येऊ नयेत. त्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश देण्यात यावा.
- विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सोय उपलब्ध असल्यास, वसतीगृहाची एकूण प्रवेश क्षमता विचारात घेऊन उपरोक्त क्र. २ प्रमाणे आरक्षणाची अंमलबजावणी करावी.
- प्रवेश समितीचा अहवाल विहित नमुन्यात वेळोवेळी विशेष कक्षाला पाठवावा.

महाराष्ट्र राज्याव्यतिरीक्त अन्य राज्यांतील संलग्न महाविद्यालयांनी, संबंधीत राज्य शासनाच्या प्रवेशासंबंधातील आरक्षण धोरणाप्रमाणे कार्यवाही करावी.

**(डॉ. दिपक देशपांडे)** २५/४
कुलसचिव

**प्रती,**
विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभागप्रमुख,
विद्यापीठ संचलित सर्व महाविद्यालय/इंस्टिटयुट/सेंटर/संस्थेच्या प्राचार्या/प्राचार्य/संचालक,
विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्या/प्राचार्य,